# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.02.2025** **वार : रविवार**

---

- सामान्य नागरिकांना दिलासा देण्याचं काम पोलीस दलानं करावं- मुख्यमंत्र्यांची अपेक्षा
- पुणे विभागात जीबीएस चे आतापर्यंत दोनशे आठ रुग्ण
- कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी पुणे जिल्ह्यात शेतकऱ्यांना ओळखपत्राचं वाटप आणि
- नामवंत पर्यटन उद्योजक केसरी पाटील यांचं निधन

फडणवीस

राज्य सरकारच्या वतीनं पोलीस दलाकरीता नवीन कार्यालयं, वाहनं, सीसीटिव्ही, अत्याधुनिक तंत्रज्ञान अशा प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. पोलिसांनी गेल्या काही वर्षांमध्ये अतिशय नेत्रदीपक कामगिरी केली असून येत्या काळातही सामान्य नागरिकांना दिलासा देण्याचं काम राज्यातील पोलीस दल करेल, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयातर्फे शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात आयोजित 'तरंग-2025' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यापुढेही पुण्यासारख्या शहरांमध्ये अधिकाधिक घटनांच्या अनुषंगानं पोलिसांचा प्रतिसादाचा वेळ कमीत कमी असला पाहिजे, पोलिसांचा वावर नागरिकांना जाणवला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करताना मुख्यमंत्री म्हणाले...

फडणवीस यांच्या हस्ते कॉप-24 या उपक्रमाअंतर्गत दुचाकी आणि चारचाकी वाहनांना हिरवा झेंडा दाखवून लोकार्पण करण्यात आलं. तसंच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या पाल्यांचा सन्मान करण्यात आला. पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्याची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली.

पवार

आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी चांगले वकील देऊन ओबीसींसह सर्व घटकांना आरक्षण देऊन निवडणुका होण्यासाठी प्रयत्न करत असल्याचं उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. पुणे महापालिकेच्या 75 व्या वर्धापन दिनानिमित्त पवार यांनी काल महापालिका मुख्य भवनात येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते.

शिंदे

कोकणाचा कॅलिफोर्निया नव्हे, तर कॅलिफोर्नियाला कोकणासारखं व्हावंसं वाटलं पाहिजे, असं काम आपल्याला करायचं आहे,' असं प्रतिपादन शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल रत्नागिरीत केलं. विधानसभा निवडणुकीत निवडून दिल्याबद्दल आयोजित कृतज्ञता सभेत ते बोलत होते. या वेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातल्या अनेक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केला.

विद्यापीठ

देशभरात सहकार क्षेत्र अधिक समृद्ध करण्याच्या उद्देशानं स्वतंत्र विद्यापीठ करण्याचा संकल्प केंद्र सरकारनं केला असून त्यासंबंधीचं विधेयक संसदेत मांडण्यात आलं आहे, ते मंजूर झाल्यावर, लवकरच देशात पहिलं सहकार विद्यापीठ गुजरातमध्ये स्थापन होईल, अशी माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात दिली . वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेत सिक-टॅब आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी आणंद इथल्या ग्रामीण व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉक्टर उमाकांत दास, एनआयबीएमचे संचालक प्राध्यापक पार्थ रे आणि १३ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. वैम्निकॉमच्या संचालक डॉक्टर हेमा यादव यांनी आंतरराष्ट्रीय सहकार परिषद भरविण्यासंदर्भातील भूमिका यावेळी बोलताना मांडली.

धर्मांतर कायदा

बेकायदा धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्याच्या कायदेशीर तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी राज्यसरकारनं पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांच्या सात सदस्यांची समिती स्थापन केली आहे. बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहादविषयी राज्यातल्या सद्यस्थितीचा, ही समिती अभ्यास करून या संदर्भातल्या तक्रारींवरील कार्यवाहीसाठीच्या उपाययोजना सुचवणार आहे. इतर राज्यांमधल्या या संबंधित कायद्यांचा, ही समिती अभ्यास करणार आहे.

## <u>सरन्यायाधीश</u>

विधी- विद्यापीठातून केवळ कायद्याची अक्षर ओळख करून घेण्याऐवजी कायद्यामागची भूमिका, इतिहास, कायद्याचा व्यावहारिक उपयोग आणि अंमलबजावणी समजून घेणं आवश्यक असल्याचं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी काल केलं. नागपूरजवळ वारंगा इथे महाराष्ट्र राष्ट्रीय विधी-विद्यापीठ नागपूरच्या तिसऱ्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

## <u>जीबीएस</u>

पुणे विभागात गुइलेन बॅरे सिंड्रोम म्हणजे जीबीएस चे आतापर्यंत दोनशे आठ रुग्ण आढळून आले आहेत. या रुग्णांमध्ये प्रामुख्यानं कॅम्पायलो-बॅक्टर जेजुनी आणि नोरोव्हायरसचा संसर्ग आढळून आला असून, हेच जीबीएस उद्रेकाचं कारण असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागानं दिली आहे. या रुग्णांपैकी 42 रुग्ण पुणे महापालिका हद्दीतले, 94 रुग्ण पुणे महापालिकेत नव्यानं समाविष्ट केलेल्या गावांमधले , 30 पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतले तर 32 पुणे ग्रामीण भाग आणि 10 रुग्ण इतर जिल्ह्यातले आहेत. सिंहगड रस्ता परिसरात आढळलेले ९० रुग्ण हे नांदेड गावातील विहीर आणि खडकवासला धरणातील पाण्याचा स्रोत वापरणारे आहेत.

## <u>शेतकरी</u>

पुणे जिल्ह्यात आत्तापर्यंत 2 लाख 8 हजार 886 शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात आले आहेत. त्यात सर्वाधिक ओळख क्रमांक जुन्नर तालुक्यात दिले आहेत. पुणे शहरात शेतकऱ्यांची संख्या कमी असल्यानं केवळ 21 शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात आले . शेतकऱ्यांकडे जमीन, कर्ज, मिळणाऱ्या योजनांचा लाभ आदी माहिती असणारं एक ओळखपत्र ॲग्रिस्टेकच्या माध्यमातून दिलं जातं. कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी यापुढे ओळख क्रमांक गरजेचा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नोंदणी करून लवकरात लवकर ओळख क्रमांक घ्यावा असं आवाहन उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर यांनी केलं आहे.

## <u>सेवालाल जयंती</u>

सामाजिक न्याय, सत्य आणि नीतिमत्ता यांचं अधिष्ठान असलेले, गोर-बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत श्री सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सागर शासकीय निवासस्थानी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यवतमाळ जिल्ह्यात बोरगाव दाभडी इथे बंजारा तरुण, तरुणी आणि आबाल वृद्धांनी पारंपारिक वेशभूषेत मिरवणुकीत सहभाग घेतला. बंजारा समाजाचं पारंपरिक लोकनृत्य आणि वाद्यांनसह निघालेल्या या

मिरवणुकीत संत सेवालाल महाराजांचा जयघोष करण्यात आला. राज्यात ठिकठिकाणी संत श्री सेवालाल महाराज यांना विविध कार्यक्रमांद्वारे अभिवादन करण्यात आलं.

<u>मसासं</u>

४४व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचा शुभारंभ काल ग्रंथदिंडीनं झाला. छत्रपती संभाजीनगर इथे वाळूज इथल्या दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात उभारलेल्या- विलासराव देशमुख साहित्य नगरीत, हे संमेलन सुरू आहे; ते आज संध्याकाळपर्यंत चालणार आहे. या संमेलनात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

<u>अभा साहित्य संमेलन</u>

सरहद- पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या दिल्ली इथे **21** ते **23** फेब्रुवारी ला **98**वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आलं आहे;; या निमित्तानं पुणे ते दिल्ली रेल्वे प्रवासादरम्यान फिरत्या चाकांवर - 'मराठी साहित्ययात्री संमेलन' आयोजित करण्यात आलं आहे. मुख्य संमेलनानिमित्त रेल्वेत होणारं हे मराठी भाषेतलं पहिलंच तर जगातलं सगळ्यात मोठं आणि दीर्घ साहित्य संमेलन ठरणार आहे.

<u>गडकरी</u>

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची संकल्पना असलेल्या खासदार ज्येष्ठ नागरिक सांस्कृतिक महोत्सवाचं उद्घाटन काल अभिनेते जितेंद्र ; यांच्या हस्ते नागपूरमध्ये करण्यात आलं. ज्येष्ठ नागरिकांचं आयुष्य अधिकाधिक आनंदी करण्याचा, त्यांच्या आयुष्यात सकारात्मकता यावी, त्यांचं आयुष्य सुखकर व्हावं या उद्देशानं - दरवर्षी विविध शिबिरांसह खासदार सांस्कृतिक महोत्सवाचं आयोजन केलं जातं. त्याला मिळत असलेला प्रतिसाद पाहून महोत्सवामागचा उद्देश साध्य होत असल्याचं मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी व्यक्त केलं.

<u>कॉलसेंटर</u>

नाशिक शहरातील एका बंगल्यात भाडेकरू म्हणून राहणाऱ्या सहा युवक आणि एका युवतीनं मिळून अमेरिकेतील नागरिकांची कोट्यवधींची फसवणूक केल्याचं सायबर पोलिसांनी उघडकीस आणलं आहे. या बंगल्यावर धाड टाकून पोलिसांनी हे बनावट कॉल सेंटर उद्ध्वस्त केलं आणि सात जणांना अटक केली.

<u>निधन</u>

पर्यटन क्षेत्रात मोठं योगदान देणारे - केसरी टुर्सचे संस्थापक अध्यक्ष - केसरी पाटील यांचं काल मुंबईत वार्धक्यामुळे निधन झालं. ते **90** वर्षांचे होते. पर्यटन क्षेत्रातील संधीची ओळख करून देणारा, महाराष्ट्राचं नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणारा

उद्यमी म्हणून- उद्यमशील केसरीभाऊ पाटील, यांचं नाव सदैव स्मरणात राहील, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाटील यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

हवामान

हवामान - राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.